**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२</u>** **<u>नि.फौ.ख.क्र.१००४/२०२०</u>**

निशाणी क्र.२०

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | धनंजय विलास पालवे |
| वय | : | ४३ वर्षे |
| व्यवसाय | : | भाजीपाला विक्री |
| राहणार | : | वरवंडे गल्ली, माळीवाडा, अहमदनगर |

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ए. सय्यद यांच्यातर्फे:-</u>**

१. मी मेडीकलमध्ये गेलो होतो त्यावेळी पोलिसांनी मला भेटून कोतवाली पोलीस स्टेशनला येण्याबाबत सांगितले होते. मी दि.०७/०४/२०२० रोजी साधारण सहा ते साडेसहा वाजताच्या दरम्यान पोलीस स्टेशनला गेलो होतो. त्यावेळी पोलिसांनी मला हा पंचनामा आहे असे म्हणून त्यावर सही करायला लावली. पंचनाम्यामध्ये काय लिहिले होते हे मी वाचून पाहिले नाही. पंचनामा कशासाठी होता हे मला सांगता येणार नाही.

**(सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली ती देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.१४/०७/२०२० रोजी कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी हेमंत भंगाळे यांनी मला अंगझडती पंचनामा करण्यासाठी बोलवले होते. हे मला सांगता येणार नाही की, त्यादिवशी ते शाहरूख अस्लम मनियार याच्याकडून काय जप्त करणार होते. हे म्हणणे खरे नाही की, हेमंत भंगाळे साहेब यांनी त्यादिवशी आरोपीच्या उजव्या बाजुच्या खिशातून एक फाईट जप्त केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, भंगाळे साहेब यांनी माझ्यासमक्ष ती फाईट जप्त केल्यानंतर पंचनामा तयार केला, त्यावर मी व दुस-या पंचाने सही केली. सदर पंचनामा मला दाखवण्यात आला, त्यावर माझी सही आहे, सहीला **<u>नि.क्र.२१</u>** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी शाहरूख माझ्या ओळखीचा आहे व त्याला मदत होण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला दाखविण्यात आलेली फाईट माझ्यासमक्ष जप्त केलेली आहे.

**<u>आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. ए. डी. अडागळे यांच्यातर्फे :-</u>**

३.  हे म्हणणे खरे आहे की, मला दाखवण्यात आलेली फाईट मी न्यायालयात प्रथमच पाहिलेली आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**
**<u>फेरतपास नाही.</u>**

**<u>श्रवणोत्तर स्वीकृत.</u>**

समक्ष,

MUSALE UJWALA TUKARAM Digitally signed by MUSALE UJWALA TUKARAM Date: 2025.08.05 17:47:30 +0530

दिनांक : ०५/०८/२०२५

**(डॉ. उज्वला मुसळे)**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१६, अहमदनगर.

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१</u>** **<u>नि.फौ.ख.क्र.१००४/२०२०</u>**

निशाणी क्र.१८

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | महेश रमेश आरडे |
| वय | : | ४२ वर्षे |
| व्यवसाय | : | मजुरी |
| राहणार | : | माळीवाडा, अहमदनगर |

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ए. सय्यद यांच्यातर्फे:-</u>**

१. मी घरी जात असताना कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी श्री. भंगाळे साहेब यांनी मला बोलवून पंचनामा करण्याबाबत सांगितले. त्यावेळी लॉकडाऊन होते, तारीख मला आठवत नाही, संध्याकाळची वेळ होती. मी जेवण करून संध्याकाळच्यावेळी माळीवाडा वेशीकडून जुनी वसंत टॉकीज रोडला जात असताना सदर कर्मचारी मला भेटले. त्यावेळी त्यांच्यासोबत दोन पोलीस कर्मचारी व एक मुलगा होता, त्या मुलाचे नाव मला माहित नाही. मी कागदावर सही केली, त्यामध्ये काय लिहिले होते हे मला सांगता येणार नाही. आता मला पंचनामा दाखवण्यात आला, पंचनाम्यावरील सही माझी आहे, परंतु मजकूर मला माहित नाही, सहीला **<u>नि.क्र.१९</u>** देण्यात येते.

**(सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली ती देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.१४/०७/२०२० रोजी संध्याकाळी साडेसहा ते सातच्या दरम्यान कोतवाली पोलीस स्टेशन पोलीस कर्मचारी हेमंत भंगाळे हे मला माळीवाडा येथे भेटले होते. हे म्हणणे खरे नाही की, हेमंत भंगाळे साहेब यांच्यासोबत असलेला मुलगा त्यांनी मला दाखवून त्याला त्याठिकाणी मारहाण झालेली आहे व तो मारहाण केलेले ठिकाण दाखवून त्याठिकाणचा पंचनामा करायचा आहे, तुम्ही पंच म्हणून सही करा असे मला सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्यासोबत असलेल्या मुलाने महावीर प्लॅस्टीकसमोरचे घटनास्थळ दाखवले. हे म्हणणे खरे आहे की, त्या मुलाने

घटनास्थळ दाखवल्यानंतर भंगाळे साहेब यांनी हा पंचनामा लिहिला व त्यावर माझ्या सहया घेतल्या.

<u>**आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. ए. डी. अडागळे यांच्यातर्फे :-**</u>

३. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनाम्यामध्ये काय लिहिले आहे हे मला माहित नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी केवळ तयार पंचनाम्यावर सही केली आहे. भंगाळे साहेब यांनी मला पोलीस स्टेशनला कधीही बोलवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

<u>**उलटतपास पूर्ण.**</u>
<u>**फेरतपास नाही.**</u>

<u>**श्रवणोत्तर स्वीकृत.**</u>

समक्ष,

MUSALE UJWALA TUKARAM
Digitally signed by MUSALE UJWALA TUKARAM
Date: 2025.08.05 17:47:36 +0530

दिनांक : ०५/०८/२०२५

**(डॉ. उज्वला मुसळे)**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१६, अहमदनगर.